दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.३० एप्रिल २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २४१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 30 April 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 241 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## बच्चू कडूंचे विधान परिषदेवर जाण्याचे संकेत

**मुंबई**–प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी आपल्या संघटनेची शिवसेनेसोबत होणाऱ्या संभाव्य विलिनीकरणाच्या मुद्यावरील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी या प्रकरणी मुद्यांवर आधारित शिवसेनेची युती करण्याची तयारी दर्शवली आहे. आम्ही खूप संघर्षातून संघटना उभी केली आहे. त्यामुळे विलिनीकरणाच्या बातम्या पाहून दुःख वाटले. आम्हाला कोणत्याही पक्षाचा पाठिंबा नाही. पाठिंबा देतो म्हटले तरी आम्ही घेत नाही. एवढे आम्ही तटस्थ आहोत, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी कागदपत्रे माझ्या बॅगेतच आहेत, असे सांगत विधान परिषदेवर जाण्याची आपली तयारी असल्याचेही स्पष्ट केले.माजी मंत्री बच्चू कडू यांचा प्रहार पक्ष शिवसेनेत विलीन होणार असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेषतः शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची ऑफर देण्यात आल्याचाही दावा केला जात आहे. बच्चू कडू यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणी विस्तृत भाष्य केले.

# राज्यात केंद्रीय विद्यालयांसाठी मिळणार निःशुल्क सरकारी जागा-मुख्यमंत्री फडणवीस सरकारचा निर्णय

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यांत केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी केंद्रीय विद्यालय संघटनकडून जागा मागितली असल्यास रीतसर मान्यता मिळालेल्या केंद्रीय विद्यालयांसाठी निशुल्क जागा देण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस सरकारने आज घेतला. विशेष म्हणजे, रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे येथे केंद्रीय विद्यालयासाठी याच निर्णयाने जागा देण्यात आली. आता राज्यात केंद्रीय विद्यालये उभारण्यासाठी गती येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रस्ताव दिला. त्यावरून,शासकीय भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किमतीने कब्जेहक्काने व भोगवटादार वर्ग दोन या धारणाधिकाराने हस्तांतरित करण्यास मान्यता देण्याचा निर्णय झाला आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे नाचणे येथील स.नंबर ९३ मधील एकूण १० हेक्टर ३० गुंठे क्षेत्रापैकी २ हेक्टर ५० गुंठे जमीन केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी निश्चित करण्यात आली आहे. ही जागा केंद्रीय विद्यालय संघटन, नवी दिल्ली यांना



'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने प्रदान करण्यात येईल. विशेष म्हणजे, ही जमीन प्रदान करताना कोणताही भोगाधिकार आकार किंवा महसूल शुल्क आकारले जाणार नाही, म्हणजेच ही जमीन पूर्णपणे महसूलमुक्त आणि विनामूल्य दिली जाणार आहे.
महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्येही केंद्रीय विद्यालये उभारण्यासाठी राज्य सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. केंद्रीय विद्यालय संघटन, नवी दिल्ली यांनी ज्या-ज्या जिल्ह्यांमध्ये नवीन विद्यालये सुरू करण्यासाठी रितसर मान्यता दिली आहे किंवा भविष्यात देणार आहेत, अशा सर्व प्रस्तावांना आता गती मिळणार आहे.अशा प्रस्तावांमध्ये शासकीय जमीन 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने आणि विनामूल्य तत्त्वावर हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. यामुळे भविष्यात केंद्रीय विद्यालयांसाठी जमिनीचे प्रस्ताव शासन स्तरावर आल्यास, त्याला तातडीने मंजुरी मिळणे सोपे होणार आहे.
केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यां पाल्यांसह स्थानिक विद्यार्थ्यांसाठीही ही विद्यालये अत्यंत महत्त्वाची ठरतील. शासकीय जमिनींच्या या विशेष वाटपामुळे शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या उभारणीतील मोठा अडथळा दूर झाला आहे.

# माजलगाव बसस्थानकात नितीन जुजगर यांच्या वतीने पाणपोई सुरू

### उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये प्रवाशांना मिळणार थंड पाण्याचा आधार




**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन माजलगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन सोपानअप्पा जुजगर माजलगावकर यांच्या वतीने बसस्थानक परिसरात प्रवाशांसाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे. या स्तुत्य उपक्रमाचे उद्घाटन जोशी साहेब (ATS) व अमोल डाके यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.
उन्हाळ्याच्या कडाक्यात प्रवासी, वाटसरूंची तहान भागवण्यासाठी ही पाणपोई सुरू करण्यात आली असून, ती सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा ठरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गोरगरीब प्रवाशांना आता बाटलीबंद पाणी विकत घेण्याची गरज भासणार नाही. विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवासात पाण्याची सोय करणे कठीण असलेल्या नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.याप्रसंगी बोलताना नितीन जुजगर म्हणाले की, उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वसामान्यांचे होणारे हाल पाहून आपण ही सेवा प्रवाशांना शुद्ध आणि थंड पाणी मिळावे हाच यामागचा उद्देश असून, उन्हाळ्याच्या अखेरपर्यंत ही सेवा सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.
या पाणपोईमुळे प्रवासी, बसचालक, वाहक तसेच स्थानिक नागरिकांची मोठी सोय झाली असून, प्रवाशांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.जोशी साहेब (ATS) व अमोल दादा डाके यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुनील गोसावी, आकाश गिरी, अमोल शहाणे, बाळू शिंदे तसेच एसटी महामंडळ माजलगाव येथील कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बसस्थानकातील चालक, वाहक, प्रवासी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपस्थितांना पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

# आष्टीत उन्हाचा कडाका वाढला थंडपेयांकडे नागरिकांचा ओढा

**दैनिक वादळ वार्ता**
**आष्टी । प्रतिनिधी**

एप्रिल महिन्याच्या अखेरीस उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत असून आष्टी शहर अक्षरशः तापले आहे. दुपारच्या सुमारास रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत असून उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. वाढत्या तापमानाचा दैनंदिन जीवनावर स्पष्ट परिणाम जाणवत आहे.
या तीव्र उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांचा कल आता थंडपेयांकडे मोठ्या प्रमाणात वळला आहे. शहरातील लिंबूपाणी, उसाचा रस, ताक, शीतपेय तसेच आईस्क्रीम विक्रेत्यांकडे ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत थंडपेयांच्या दुकानांवर वर्दळ वाढली आहे.
व्यवसायिकांच्या मते, मागील काही दिवसांत थंडपेयांची विक्री लक्षणीय वाढली असून उन्हामुळे त्यांच्या व्यवसायाला चांगली चालना मिळाली आहे. उन्ह वाढताच ग्राहकांची संख्या दुपटीने वाढली आहे, अशी प्रतिक्रिया एका विक्रेत्याने दिली.दरम्यान, डॉक्टरांनी नागरिकांना उन्हात बाहेर पडताना आवश्यक काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. पुरेसे पाणी पिणे, डोक्यावर आच्छादन ठेवणे आणि शक्यतो दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या काही दिवसांत तापमान आणखी वाढण्याची शक्यता असून नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे.



# गप्पेवाडीतील धोकादायक वीज तारांकडे महावितरणचे दुर्लक्ष;अपघाताची भीती वाढली

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गप्पेवाडी गावात बाराभाई वस्ती ते महादेव वस्ती या दरम्यान ३-फेज वीज लाईनची तार अक्षरशः जमिनीवर पडलेल्या अवस्थेत असल्याने नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसा पासून ही परिस्थिती कायम असूनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,वीजतार खाली पडल्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना, विशेषतः लहान मुलांना व जनावरांना मोठा धोका निर्माण झाला आहे.पावसाळा जवळ आल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.ओलसर जमिनीमुळे विजेचा प्रवाह पसरू शकतो, ज्यामुळे अपघाताची भीती अधिक वाढली आहे.ग्रामस्थांनी याबाबत अनेक वेळा महावितरण कार्यालय,विडा येथे तक्रारी केल्या असल्याचे सांगितले जाते.मात्र, अद्यापपर्यंत कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?असा सवालही ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.या भागात शेतकरी, मजूर आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने रहदारी करत असतात.



# २० हजारांची लाच घेताना कंत्राटी अभियंता एसीबीच्या जाळ्यात; जिल्हा परिषदेचे दोन कर्मचारीही ताब्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास योजनेअंतर्गत मंजूर कामाच्या प्रशासकीय मान्यता आदेशाची प्रत देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना शहादा येथील कंत्राटी अभियंत्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील एका वरिष्ठ सहाय्यकासह सहायक लेखा अधिकाऱ्यावरही गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.
त्यात संशयित म्हणून भूपेंद्र सरचंदराव राठोड ( वय ३१): कंत्राटी अभियंता, पंचायत समिती शहादा (ग्रामीण गृहनिर्माण).
रमेश मन्साराम बागुल (वय ५६) वरिष्ठ सहायक, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार. चंद्रेश जगजीवनदास शहा (वय ५१) सहायक लेखा अधिकारी, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार असे आहेत.तक्रारदाराने कुकावल (तालुका शहादा) येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीत पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर केला होता. या कामासाठी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी २ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता.



या कामाच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशाची प्रत आरोपी रमेश बागुल यांनी स्वतःकडे न ठेवता ती परस्पर अभियंता भूपेंद्र राठोड यांच्याकडे दिली होती. तक्रारदार जेव्हा २७ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेत चौकशीसाठी गेले, तेव्हा रमेश बागुल यांनी सदर प्रत मिळवण्यासाठी २०,००० रुपयांची मागणी केली आणि ही रक्कम भूपेंद्र राठोड याला देण्यास सांगितले. या मागणीला सहायक लेखा अधिकारी चंद्रेश शहा यांनीही प्रोत्साहन दिले.लाचेची मागणी झाल्याने तक्रारदाराने नंदुरबार एसीबीकडे धाव घेतली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर, दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी शहादा येथे सापळा रचण्यात आला. भूपेंद्र राठोड याने तक्रारदाराकडून २०,००० रुपयांची लाच स्वीकारताच त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी तिन्ही आरोपींना ताब्यात घेऊन शहादा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ७ आणि १२ अन्वये गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.ही कारवाई नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक प्रशांत भरते, पोलीस निरीक्षक विकास लोंढे व त्यांच्या पथकाने यशस्वी केली.



# संपादकीय

## वसंत वैभव

ल्या ऋतूच्या बहरापूर्वी, पानगळीला ऊत येतो. कात टाकूनी नवं रुजवाया, खुणा दावित निसर्ग जातो. वर्षभर सहा ऋतूंचे सहा आगळेवेगळे सोहळे पाहतचं आपण लहानाचे मोठे होतो. यातल्या प्रत्येक मनभावन ऋतूचा साज लाजवाब असतो, तर बाज त्याहून अनोखा असतो. डोळे उघडे ठेवून निसर्गाची किमया पाहता आली, तर आमच्यासारखे भाग्यवान आम्हीचं! निसर्ग आणि मानवी मनाचं नातं चिरकाल असतं तेव्हा डोळ्यांनी पाहिलेला स्वर्ग चित्रकाराच्या कुंचल्यातून उमटतो. कवी मनात हळव्या कवितांची पेरणी करतो. संगीताच्या तालावर निसर्गाचा सूर हेरतो. कवी मन हे नेहमी वाहत्या पाण्यासारखं असतं. कवितेच्या कुठल्याही प्रकाराला स्थलकालाची मर्यादा नसल्याने मनाशी निगडित कवितांची समग्र शाळाचं कवी भरवू शकतो. निसर्गगानासारखे विषय कवीला आवडत असल्याने साहित्यातून ते मांडले जातात. निसर्ग प्रेमातून मनात साचलेला गर्भित अर्थ निसर्गाशी जोडला जातो आणि कविता जन्माला येतात. काही लिहिण्यापूर्वी निसर्गकवी इंदिरा संत यांची कविता आपण पाहू.आला शिशिर संपत पानगळती सरली, ऋतुराजाची चाहूल झाडावेलींना लागली. देवचाफा हा पाहा ना अंगोपांगी बहरला, मोगराही कोवळ्याशा पाने सजाया लागला. डोळे खिळविती माझे जास्वंदीची लाल फुले, बहाव्याने येथे तेथे सोनतोरण बांधिले. कुहू गाऊन कोकिळा करी वसंत स्वागत, तिलाही मी विनविते शिकव ना मला गीत.मनात साठलेला अतिरिक्त महत्त्वाचा संदेश देताना कवयित्री म्हणते, शिशिर संपून ऋतुराज वसंत यावा तशी मनोवस्था झाली आहे. मनाच्या नैराश्यग्रस्त काळात वसंताच्या आगमनाकरिता निसर्गातील रंगीत फुलझाडं बहरली आहेत की, माझ्या जीवनीसुद्धा अशी रुजवात पेटणार आहे. हे कोकिळे तुझ्यासारखे भारलेले चैतन्य घेऊन काळाच्या सोबतीने चालायचंय, त्यासाठी मला तुझे गीत शिकव. कविता संपताच कवयित्रीचा ध्यास संपतो. मानवी मनाचे सारथ्य करणाऱ्या कविता म्हणजे हृदय फाडून दाखवलेली निसर्गाची विविध रूपं. डोळ्यातला निसर्ग प्रत्येकी वेगळा असू शकल्याने पानगळीचा शिशिर मला भकास वाटतो. थंडी अंग टाकते. गुलाबी गारवा हवेतल्या हवेत विरताच हवा पालटते. चैत्रापूर्वीचं वृक्षसंपदा निष्पर्ण होऊ लागते. हिरवेपणाचे रंग भुर्रकन उडून जावे तशी हिरवळीची वनराई निस्तेज होते. पानगळीस येता आसमंती शुष्कता वासंतिक आगमनाने मनास येते प्रसन्नता. निसर्गाचा हिरवा मांडव रूसून बसता मोगरा, गुलाब बहरू लागतो. पळस, गुलमोहर लाल–भगव्यासंगे श्रृंगारिक रंगपंचमी खेळायला झाडावर विसावतात. पिवळा बहावा हळदुल्या अंगाची नवपरिणीता होताचं मुग्धकलिका उनाड समीरासवे बागडू लागतात. राघू मैनेच्या जोडीची कुजबुज, पक्ष्यांचा कलरव कानी पडताच अगम्य शांततेने परिसर न्हाऊन निघतो. चहूबाजूस निसर्गाची नवलाई, वसुंधरेची हिरवाई पाहता आपण दंग होतो. आम्रतरूच्या सुगंधित मोहोरावर मोहर उठवणारे कोकिळाचे मंजूळ स्वर.पानोपानी पळस फुलतो, आंबा मोहरतो त्यासमयी नवचैतन्याने जीवन फुलवणारा ऋतू वसंतदूत होऊन येतो. पानगळीनंतर पिवळी जर्द मोहरी फुलताना वासंतिक कळी मोगरा खुलतो. सृजन घडताना खोडाजवळच नुकताचं फुटलेला कोवळा अंकुर शक्तिप्रदर्शन करतो. झुळझुळणाऱ्या चैत्रबनातील वाऱ्याची दिशा बदलते. अवनीला कवेत घेण्यासाठी वसंत सरसावतो. रानोमाळी भटकू लागतो. उत्क्रांतीत नवजीवनाची बियाणं पेरली जातात. उगवता सूर्य आणि आपल्यातले नाते पक्के होते. सोनचाफा, अनंत, मोगऱ्यासारखी सुवासिक अत्तर निसर्ग बहाल करतो. बहरण्याचा ऋतू वसंत आपलासा वाटे सर्वांना पहावी छोटी पानं मोठाली हिरवी होत जाताना. पालवी फुटता वेलीत वसे रम्य वनराई, खुणावित जाते मज वासंतिक आमराई.वसंत ऋतूचे पृथ्वीवर झालेले आगमन म्हणजे सजूनधजून आलेली नवी नवेली नवरी त्याच्या येण्याने पानं, फुलं, पक्ष्यांनी सजलेली अवनीमाता प्रफुल्लित होते. कुसुमांच्या वैभवाला बहर येतो. प्रेमवेड्यांसाठी ये वादिया ये फीजाए बुला रही है तुम्हेची पर्वणी असते. मधुमास वसंत ऋतू नानाविध रंगांची उधळण करीत येतो. वेगवेगळ्या गंधाची, आकाराची कुसुमे लेऊन अवनी सजते. वृक्षवेलींचे पानगळतीचे दिन मधुमास येण्याने विरून जातात. सृष्टी मनोमनी बोलते पानगळीनंतर आलेली मरगळ लवकरच जाईल. नवपर्णीने माझं आयुष्य पुन्हा सुखासीन होईल. बघता बघता तांबड्या मातीवर हिरवळ पसरते. कोवळ्या पालवीचे लुसलुशीत तारुण्य नयनांत भरताना लाल, हिरव्या, पिवळ्या, निळ्या, जांभळ्या, भगव्या, पांढऱ्या रंगाचा संबंध आपल्याशी येतो. मानाची पानं आपल्यासमोर मांडली जातात. त्यातलं जे पान आपणास आवडेल तो ऋतू आपला होत जातो आणि मनपटलावर गुणगुणत ओळी येतात धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना शब्दरूप आले मुक्या भावनांना तृप्तीने नयन पाणावतात. हिरव्याकंच पालवीला पाहून मोद होतो. इवल्याशा कळ्या वृक्ष वेलींवर जन्म घेऊ लागतात. निसर्गसौंदर्य दृष्य पाहतांना कविवर्य ग. दि. माडगूळकर यांच्या कवितेच्या ओळी आठवतात रुसू नको कलिके बाई, हस ना, उमल गडे, कर घाई. वसंत ऋतू पाहा जादूगार हा आला, नितांत रम्य साज साजरा ल्याला, बहरु दे नवतीची नवलाई नवतीची नवलाई सांगणारा वसंतोत्सव म्हणजे सुंदर, चैतन्यमय सांजवेळ, धुंद चांदणरात्री, सुगंधित वारा, भृंग्यांचे फुलाभोवती गुंजारव. जणू दिशा दिशांतून प्रेमरसाचा उन्माद वाढवणारे वासंतिक वातावरण.वसंत ऋतू म्हणजे आशावाद. पिवळी पानं गळून हिरवी पानं येतात. बदलणं या नियमाचं पालन होत तेव्हा निसर्ग काही धरून ठेवत नाही. जे आलं ते जाणार या स्थायीभावाप्रमाणे पानगळीसारखी संकट येतात नि विरून जातात. झाडांना पालवी फुटते. क्षृंगारण्यासाठी कळ्या फुलं येतात. आनंद प्रेम देऊन जातात. पानगळ म्हणजे निराशेवर आशेचा किरण. आलेल्या कडू गोड अनुभवाचा सकारात्मक उत्सव. जुन्या वाटेवर चालताना नव्याचं स्वागत करायचं. आशावादाचा स्नेह जपायचा आणि आपल्यासह इतरांचं जीवन सुकर करायचं. त्यासाठी त्यांच्यासमोर अमृताचा पेला धरावा न् जीवनात वसंत फुलवावा.

# पत्रकार जयेश जाधव यांचा वाढदिवसा निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

येथील पत्रकार जयेश जाधव यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दि.२८/०४/२०२६ मंगळवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ०२ वाजेपर्यंत महाराष्ट्र शासन वनविभाग कर्जत अधिकारी कर्मचारी यांची मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जयेश जाधव यांचे सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील खूप मोठे योगदान असून तळागाळात आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून निर्भीडपणे आपली भूमिका बजावत आहेत.

अ पोलीस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण देशात, जिल्ह्यात यांसारखे अनेक विविध सामाजिक उपक्रम,कार्यक्रम राबविण्यात येतात त्यात समाजामध्ये नशामुक्ती, बालविवाह, अंमली पदार्थ विरोधी जनजागृती तसेच शासकीय अधिकारी नीम शासकीय अधिकारी तसेच गावात, खेड्या पाड्यात, दुर्गम भागात पोलिसांसाठी शालेय विद्यार्थ्यांन साठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येत असून त्यात २८ एप्रिल रोजी महाराष्ट्र शासन वनविभाग कर्जत येथे जयेश जाधव यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संघटनेच्या वतीने आयोजित मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले या मध्ये मोफत डोळे तपासणी, बीपी शुगर कॉलेस्ट्रॉल रक्ताच्या चाचण्या सामान्य चाचण्या, इसीजी, यांसारख्या अनेक आजारांवर निदान करण्यात आले. या कार्यक्रमात उत्कृष्ट असा प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष किशोर शितोळे यांनी राज्यातील सर्व पत्रकार बांधुनी यांसारखे सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत जेणे करुन गोर गरीब जनतेला याचा लाभ मिळेल व पत्रकार बंधूंचे कार्य खूप मोठ आहे नागरिकांना घर बसल्या बसल्या सर्व जगाची माहिती झटपट प्राप्त होते. यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ ज्ञानेश्वर साळोखे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री किशोर शितोळे डॉ.बन्सीलाल पाटील माधव बाग, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल जाधव,कर्जत प्रभातचे संपादक जयेश जाधव, डॉ विशाल बनसोडे द्रिष्टी आय हॉस्पिटल बदलापूर यांच्या माध्यमातून डोळे तपासणी डॉ,दिपीका, डॉ सोनल, डॉ हर्षाली हजारें तसेच कर्जत वनपरिक्षेत्र अधिकारी समीर शिंदे, सामाजिक वनीकरण आर फ ओ राठोड , वनपाल दिघे, मेजर अनंता पाटील पाटील,देशमुख, चव्हाण, तसेच कर्जत पश्चिम वनपरिक्षेत्र चे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# ठाण्यात चोरीची फॉर्च्यूनर कार सह ४ आरोपी अटकेत



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६०/२०२६ अंतर्गत फॉर्च्यूनर वाहन चोरीची तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल होताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्य मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देण्यात आला. प्रसंगी वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने चोरीस गेलेली फॉर्च्यूनर कार अवघ्या आठ तासांत शोधून काढत चार आरोपींना अटक केली. या कारवाईमुळे वाहनचोरीच्या गुन्ह्यांवर प्रभावी अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश आले असून, या कामगिरीबद्दल पथकाचे कौतुक होत आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास रहाणे यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढून अवघ्या आठ तासांत चोरीस गेलेली फॉर्च्यूनर हस्तगत करण्यात आली.प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई सुरू आहे. पोलिसांनी आरोपींकडून अधिक चौकशी सुरू केली असून, या टोळीचा इतर वाहनचोरीच्या घटनांशी संबंध आहे का, याचाही तपास केला जात आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तपास पथकाच्या तत्परतेचे कौतुक करत अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा दिला आहे.

# सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र द्वारे रक्तदान शिबीर संपन्न

## रक्तदान शिबिराला मिळाला उत्तम प्रतिसाद



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

रक्ता अभावी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू होऊ नये तसेच गोरगरिबांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावा हा मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण द्यानपीठ वाणिज्य व कला महाविद्यालय उरण, पोलीस स्टेशन समोर उरण शहर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी १९२ रक्तदात्यांची नोंदणी करण्यात आली. त्यापैकी १८२ रक्तदाते स्वीकारण्यात आले. रक्तदानाविषयी जनजागृती करत आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला उरण तालुक्यातील नागरिकांचा, उत्तम प्रतिसाद लाभला आहे. उरण तालुक्यातील अनिरुद्ध उपासना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उरण मध्ये दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. अनिरुद्ध अकॅडमी डिझास्टर मॅनेजमेंटच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिराला सद्गुरु ब्लड बँक कोपरखैरणे महत्वाचे सहकार्य लाभले. सदर रक्तदान शिबीर उरण तालुक्यातील सर्व बापू भक्तांनी विशेष मेहनत घेतली.

# ठाणे जिल्ह्यात 'एचपीव्ही' लसीकरण घेण्याचे पालकांना उपमुख्यमंत्र्यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यातील मुलींचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'एचपीव्ही' (क्ष्ज्ञत) लसीकरण मोहिमेबाबत सनियंत्रण समितीची बैठक मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ एप्रिल, २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथील नियोजन भवनात पार पडली.यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आपल्या मुलीचे आरोग्य हीच आपली खरी संपत्ती आहे. १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींना भविष्यातील गंभीर आजारांपासून, विशेषतः गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी 'एचपीव्ही' लस हे प्रभावी सुरक्षा कवच आहे. जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रांमध्ये ही सुविधा उपलब्ध असून पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.या बैठकीस आमदार किसन कथोरे, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. बालाजी किणीकर, शांताराम मोरे, राजेश मोरे, पालक सचिव नवीन सोना, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भारतामध्ये महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग दुसऱ्या क्रमांकावर असून तो गंभीर स्वरूपाचा आहे. या आजारापासून बचाव करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून 'एचपीव्ही' लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यात १४ वर्षे पूर्ण झालेल्या व १५ वर्षे पूर्ण न झालेल्या सर्व मुलींना ही लस विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.



# नेत्यांच्या मुलाला किंवा पुतण्याला संधी देण्यापेक्षा अजित दादासाठी लढणाऱ्या अमोल मिटकरींना संधी द्या-रोहित पवार

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या संभाव्य उमेदवारांसंदर्भात चर्चा सुरू असताना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आपल्या काकी आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना भावनिक आवाहन केले आहे. पक्षातील नेत्यांच्या मुलाला किंवा पुतण्याला संधी देण्यापेक्षा अजितदादांसाठी लढणाऱ्या अमोल मिटकरी यांना संधी द्या, असे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक होणार आहे. या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. बैठकीत विधानपरिषद निवडणूकी करीता इच्छुक उमेदवारांच्या नावांवर चर्चा होणार आहे. माजी खासदार संजय नाना काकडे यांचे सुपुत्र विक्रम काकडे, सुनील तटकरे यांचे चिरंजीव अनिकेत तटकरे, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष सुरेश बिराजदार आदी नेत्यांच्या नावांची चर्चा सुरू असताना विधान परिषदेची मुदत संपत असलेल्या अमोल मिटकरी यांचे नाव मात्र स्पर्धेत नाही. अजितदादा यांच्यासाठी आवाज उठवणाऱ्या अमोल मिटकरी यांच्या नावाची चर्चा नाही यावर आमदार रोहित पवार यांनी मिटकरी यांचे नाव सुचवल्यामुळे पक्षात या संदर्भात जोरदार चर्चा आहे.अजित पवार यांच्या अपघाताविषयी तपास कुठपर्यंत आला आहे.तसेच या अपघाता विषयी पोलिसांनी एफआयआर नोंद करावा यासाठी सतत आवाज उठवित आहेत. विधीमंडळ अधिवेशनात त्यांनी अपघाता विषयी प्रश्न उपस्थित करत सरकारला जाब विचारला होता. तर राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे आमदार अमोल मिटकरी सुद्धा माध्यमातून तसेच विधीमंडळात विविध आयुधाव्दारे प्रश्न उपस्थित करत होते. मात्र त्यांच्या पक्षातील प्रमुख नेते ब्र शब्दही काढत नाहीत. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी अमोल मिटकरी यांचे नाव विधान परिषदेसाठी सुचविले असेल यात काय गैर नाही. शेवटी निर्णय पक्षाच्या अध्यक्षांचा आहे.



# सातपुड्याच्या कुशीत रंगतंय 'हिरव्या सोन्या'चं अर्थकारण!

## दोन रुपये २५ पैशांच्या 'गठ्ठ्यात' दडलाय हजारो मजुरांचा उदरनिर्वाह; नागपूर ते गुजरातचे व्यापारी मुळगीच्या जंगलात डेरेदाखल

**ज्यावेळी आपण एखाद्या दुकानातून बिडीचा बंडल विकत घेतो, त्यावेळी त्यामागे सातपुड्याच्या जंगलात ४२ अंश तापमानात अनवाणी पायी फिरणाऱ्या मजुरांचे कष्ट आणि राज पाटील यांच्या सारख्या व्यवस्थापकांचे नियोजन दडलेले असते. होराफळी आणि ओघाणी परिसरात सध्या सुरू असलेली ही लगबग सातपुड्याच्या अर्थचक्राला गती देणारी ठरत आहे.**

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

सातपुड्याच्या उत्तुंग पर्वतरांगा आता केवळ निसर्गसौंदर्यासाठीच नाही, तर 'हिरवे सोने' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तेंदू पत्त्याच्या गजबजाटाने ओसंडून वाहत आहेत. सध्या उन्हाचा पारा ४२ अंशांवर पोहोचलेला असताना, ओघाणी आणि होराफळी परिसरातील दुर्गम भागातील मजूर मात्र घाम गाळत या 'कच्च्या माला'च्या संकलनात मग्न आहेत. विशेष म्हणजे, या पानांच्या खरेदीसाठी थेट नागपूर आणि शेजारील गुजरात राज्यातील व्यारा येथून बड्या कंपन्यांचे प्रतिनिधी सातपुड्याच्या जंगलात तळ ठोकून आहेत.

तेंदूचे झाड दिसायला अवघे तीन फूट असले, तरी त्याचे अर्थकारण मात्र अफाट आहे. काळ्या कुट्ट बुंध्याला फुटलेली ही चकचकीत हिरवीगार पाने तोडण्यापासून ते नामांकित कंपन्यांच्या ब्रँडेड बिड्या तयार होईपर्यंतचा प्रवास मोठा रंजक आहे. मजुरांच्या मते, प्रत्येक पान तोडताना त्याची गुणवत्ता पारखली जाते. ज्या पानाला छिद्र नाही आणि जे पूर्णपणे प्लेन आहे, अशाच पानांना बाजारपेठेत मागणी मिळते.

जंगलातून पाने तोडून आणल्यानंतर ती चार ते पाच दिवस मोकळ्या मैदानात उन्हात वाळवली जातात. वाळवल्यानंतर या पानांचे ५०-५० च्या संख्येत गठ्ठे बांधले जातात. आजच्या महागाईच्या काळात एका गठ्ठ्याला २ रुपये २५ पैसे इतका दर मजुरांना मिळत आहे. हा दर जरी कमी वाटत असला, तरी शेकडो गठ्ठे तयार करून येथील मजूर आपला उदरनिर्वाह भागवत आहेत.



आम्ही काही दिवस आधीच स्थानिक मजुरांना खरेदीबाबत कल्पना देतो. येथील मजुरांनी मेहनतीने वाळवलेला हा दर्जात्मक कच्चा माल आम्ही नागपूर आणि गुजरातच्या मोठ्या बिडी कंपन्यांना पुरवतो,
–राज पाटील, कंपनी प्रतिनिधी व्यारा (गुजरात )

आम्ही रात्रंदिवस मेहनत करून ही पाने गोळा करतो. ५० पानांचा एक गठ्ठा तयार करताना गुणवत्तेची विशेष काळजी घेतो. हा माल आमच्याकडून घेऊन गेल्यावर मोठे कारखाने त्यावर स्वत:चा शिक्का मारून तो बाजारात विकतात.
–तुकाराम तडवी, स्थानिक मजूर ओघाणी

# आई-वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा होय-ह.भ.प.राधिकाताई सोळंके

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

आई-वडिलांची सेवा हीच ईश्वरसेवा आहे.संस्काराने मोठी झालेली मुले मुली आई वडिलांचे जीवन हे धन्य करतात असे निरूपण ह.भ.प. राधिकाताई सोळंके यांनी मत व्यक्त केले.त्या केज तालुक्यातील चंदन सावरगाव येथील प्रकाश आबासाहेब काळे यांच्या आई नावाने उभारलेल्या गृहप्रवेशा निमित्त हरिकीर्तन झाले.आपुल्या हिता जो असे जागता, धन्य माता तयाचिया कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक तयाचा हरीख वाटे देवा या अभंगावर निरुपण करताना कीर्तनातून प्रबोधनपर मत व्यक्त केले.विठ्ठलाचे अखंड चिंतन




करण्याने मानवी जीवन धन्य होते. कर्म हीच पूजा असते सेवाभावी केलेले कार्य शांती आणि समाधान प्राप्त करून देते असे अभंगाद्वारे निरूपण केले.हरी कीर्तनास भजनी मंडळ,श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराई गट शिक्षणाधिकारी पदी नांदुरकर यांची नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

पंचायत समिती कार्यालयाअंतर्गत असलेल्या गटशिक्षण कार्यालयात सेवारत असलेले ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर नांदुरकर यांची बीड जिल्हा परिषदेने गेवराईचे नवीन गट शिक्षणाधिकारीपदी नियुक्ती केली आहे .सदर नियुक्तीचे आदेश २५ एप्रिल रोजी निर्गमित करण्यात आले असून नूतन गटशिक्षण अधिकारी भीमाशंकर नांदुरकर यांनी मावळते गटशिक्षण अधिकारी प्रवीण काळम पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे. भीमाशंकर नांदुरकर हे बीड येथील रहिवासी असून त्यांनी आजवर वडवणी,

अंबाजोगाई व परळी येथे गटशिक्षण अधिकारी म्हणून पदभार सांभाळलेला आहे. अत्यंत शांत, संयमी आणि मेहनती असलेल्या नांदुरकर यांना गटशिक्षणाधिकारी पदी नियुक्ती दिल्यामुळे गेवराई तालुक्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे .ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची संख्या तालुक्यात नगण्य असूनही असलेल्या संख्याबळावर तालुक्याचा शिक्षण विभाग सांभाळणे याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. तसेच शाळेवर नोकरी न करता गटशिक्षण कार्यालयात गेल्या अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसलेले काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना त्यांच्या मूळ जागेवर पाठवण्याची जबाबदारीही नांदुरकर यांच्यावर आहे . गेवराई तालुक्याला असा अधिकारी मिळणे म्हणजे शिक्षकांचे अहोभाग्य आहे. त्यांच्या हातून तालुक्याची शिक्षण विभागाची चांगली सेवा घडो अशा सदिच्छा भेट घेऊन शिक्षक देत आहेत.



# ठाणे महानगरपालिकेत सेवा हक्क दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेत आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी सेवा हक्क दिन साजरा करण्यात आला. सेवा हक्क दिनाचे औचित्य साधून विविध सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी सकाळी ११:०० वा. महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात उपस्थित राहून एकत्रितपणे शपथ घेतली. यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनिष जोशी, जी.जी. गोदेपुरे, मधुकर बोडके यांच्यासह सहायक आयुक्त व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.सेवा हक्क दिनानिमित्त विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत शासनाने सर्व शासकीय कार्यालयाना सूचना दिलेल्या आहेत.आज ठाणे महापालिकेत सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पध्दतीने, विहीत कालमर्यादेत, प्रामाणिकतेने, निष्ठेने व तत्परतेने पार पाडण्याची शपथ घेतली. तसेच प्राधिकरणात येणाऱ्या नागरिकांना उक्त कायद्याने प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून व सेवाभाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करण्याची शपथ घेतली. ठाणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती एका क्लिकवर नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी क्यूआर कोड तयार करण्यात आला असल्याचे सहायक आयुक्त सचिन बोरसे यांनी यावेळी नमूद केले. या क्यूआर कोडचे उद्घाटन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्याहस्ते करण्यात आले. हा क्यू आर कोड स्कून केल्यानंतर महापालिकेच्या सर्व सेवांची माहिती उपलब्ध होणार आहे. तसेच सेवा हक्क दिनाबाबत जनजागृती करणारे पथनाट्य देखील यावेळी सादर करण्यात आले.



# कै.संगुबाई किशनराव शिळेकर यांचे दु:खद निधन

दैनिक वादळ वार्ता
**बिलोली । प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील हज्जापूर येथील जेष्ठ महिला नागरिक कै संगुबाई किशनराव शिळेकर यांच आज दिनांक २९ एप्रिल रोजी दुपारी १:४५ वाजता दु:खद निधन झाले त्या ६० वर्षाच्या होत्या त्यांच्या पश्चात दोन मुले सुना नातू नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे त्यांच्या पार्थिवावर दिनांक ३०/४/२०२६ रोज गुरुवारी सकाळी दहा वाजता त्यांच्या जि प प्रा शाळे मागील शेतात हज्जापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात



येणार आहे त्या सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड सदस्य किशनराव शिळेकर यांच्या पत्नी होत.

# पॅरालिसिसग्रस्त बक्षू शेख यांच्या मदतीला धावले 'हिमायत फाउंडेशन'; २५ हजारांचा धनादेश सुपूर्द

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती आणि त्यातच जडलेला पॅरालिसिसचा (पक्षाघात) आजार अशा दुहेरी संकटात सापडलेल्या बक्षू शेख यांच्या मदतीसाठी 'हिमायत फाउंडेशन' धावून आले आहे. फाउंडेशनच्या वतीने शेख यांना त्यांच्या उपचारासाठी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

बक्षू शेख हे गेल्या काही काळापासून पॅरालिसिसने आजारी असून त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत विकट आहे. उपचारासाठी पुरेसे पैसे नसल्यामुळे ते घरीच उपचारविना पडून होते. यादरम्यान त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून हिमायत फाउंडेशनच्या कार्याची माहिती घेऊन मदतीसाठी लेखी अर्ज केला होता. अर्ज प्राप्त होताच, हिमायत फाउंडेशनच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष



बक्षू शेख यांच्या घरी जाऊन त्यांच्या परिस्थितीची पाहणी केली. पाहणीत वस्तुस्थितीची खात्री पटल्यानंतर फाउंडेशनची तातडीची बैठक बोलावण्यात आली.

या बैठकीत सर्व सदस्यांनी चर्चा करून बक्षू शेख यांना २५ हजार रुपयांची मदत देण्याचा ठराव एकमताने मंजूर केला. त्यानुसार, आज त्यांना प्रत्यक्ष धनादेश सुपूर्द करण्यात आला. सध्या त्यांच्यावर सुलतानपूर येथे उपचार सुरू आहेत.

यावेळी बोलताना फाउंडेशनचे सचिव शेख मुजीब म्हणाले की, हिमायत फाउंडेशन नेहमीच गोरगरीब आणि गरजूंच्या मदतीसाठी तत्पर असते. सर्व समाजाचा फाउंडेशनवर मोठा विश्वास असून, भविष्यातही सामाजिक कार्यात फाउंडेशन नेहमीच अग्रेसर राहील.

याप्रसंगी हिमायत फाउंडेशनचे अध्यक्ष शाहरुख कुरेशी (मुफ्ती उमर), उपाध्यक्ष सय्यद सोहेल, सचिव शेख मुजीब, सहसचिव सय्यद शाकेर, प्रसिद्धी प्रमुख काझी अमान, सदस्य सय्यद मुदासिर, फहाद चाऊस, अमेर चाऊस, सालम चाऊस, सय्यद अब्दुल वाहिद, सलमान चाऊस, जिया चाऊस, साजिद पठाण, शेख इजहार, अब्दुल खावी, जिना चाऊस, लुकमान खान, जीशान खान, सय्यद गुफरान आदींची उपस्थिती होती.

# रोहितळमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी; 'सर्वधर्मसमभावा'चे दर्शन

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील रोहितळ येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे गावात पाहायला मिळालेला. जयंतीनिमित्त भीमगीत संगीत रजनी आणि व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

गावातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भव्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यात अबालवृद्धांसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



उत्सवादरम्यान गावातील सर्व स्तरांतील नागरिकांच्या उपस्थितीमुळे सामाजिक सलोख्याचे आणि एकतेचे दर्शन घडले. गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे रोहितळमधील हा जयंती सोहळा परिसरात चर्चेचा विषय ठरला.

# मस्साजोग ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत मोठा उलटफेर ; दिवंगत संतोष देशमुखांच्या पत्नीचा पराभव,स्वरूपानंद देशमुख विजयी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग ग्रामपंचायती च्या सरपंचपदासाठी झालेल्या अत्यंत चुरशीच्या पोट निवडणुकीचा निकाल बुधवार दि.२९ एप्रिल रोजी जाहीर झाला. सर्वांचे लक्ष लागून असलेल्या या लढतीत दिवंगत माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना पराभवाचा धक्का बसला असून,त्यांचे प्रतिस्पर्धी स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांच्या फरकाने विजय संपादन केला आहे.


**तणावपूर्ण वातावरणात मतमोजणी**

माजी सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये हत्या झाल्यापासून हे पद रिक्त होते.या पार्श्वभूमीवर अत्यंत तणावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या मतदानानंतर आज केज तहसील कार्यालयात मतमोजणी प्रक्रिया पार पडली. एकूण तीन फेऱ्यांमध्ये ही मतमोजणी झाली. पहिल्या फेरीपासूनच स्वरूपानंद देशमुख यांनी वर्चस्व राखले होते.पहिल्या फेरी दरम्यान स्वरूपानंद देशमुख यांची १५६ मतांची आघाडी घेतली होती.दुसऱ्या फेरी दरम्यान २० मतांची भर पडली.अंतिम निकालात एकूण ९२ मतांच्या फरकाने स्वरूपानंद देशमुख विजयी झाले.


**सहानुभूतीची लाट ओसरली?**

संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे या निवडणुकी ला मोठी भावनिक किनार लाभली होती. अश्विनी देशमुख यांना सहानुभूतीच्या जोरावर विजय मिळेल,असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज होता.मात्र, मतदारांनी स्वरूपानंद देशमुख यांच्या पारड्यात कौल दिल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

आरोपांना मतपेटीतून उत्तर दिले अशी प्रतिक्रिया स्वरूपानंद देशमुख यांनी दिली. विजयानंतर समर्थकांनी गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.यावेळी माध्यमांशी बोलताना नवनिर्वाचित सरपंच स्वरूपानंद देशमुख म्हणाले की,हा विजय स्वाभिमानी मतदारांचा आणि गोरगरीब जनतेचा आहे.निवडणुकीदरम्यान माझ्यावर अनेक आरोप झाले,मात्र मतदारांनी मतपेटीतून त्याचं चोख उत्तर दिलं आहे.संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी आधीपासून प्रयत्नशील होतो आणि यापुढेही त्यांच्या न्यायाच्या लढाईत मी सदैव अग्रभागी राहीन असे त्यांनी सांगितले.या निकालामुळे केज तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून,आता नवनिर्वाचित सरपंचांच्या कार्यकाळाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# शॉर्टसर्किटने घेतला संसाराचा बळी; पंचनामा पूर्ण



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून, मजुरी करून उदरनिर्वाह करणारे आलिम मेहबूब शेख यांचे राहते घर शॉर्टसर्किटमुळे पूर्णतः जळून खाक झाले आहे. या आगीत त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टाने उभा केलेला संसार काही क्षणांत राखेत परिवर्तित झाला.घटनेच्या वेळी घरात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली, मात्र घरातील एकही वस्तू वाचू शकली नाही. डब्यामध्ये साठवून ठेवलेली रोख रक्कम, तसेच लग्नासाठी मोठ्या कष्टाने खरेदी करून ठेवलेल्या वस्तूही आगीत जळून खाक झाल्या.या घटनेची माहिती मिळताच संबंधित तलाठी गुळभिले मॅडम यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, नुकसानीचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. प्रशासनाच्या वतीने पुढील मदतीची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती मिळत आहे.आलिम शेख यांचा संसार हा रोजंदारीवर चालणारा असून, त्यांच्या कुटुंबावर अचानक कोसळलेल्या या संकटामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. गावकऱ्यांकडून मदतीचा हात पुढे येत असून, प्रशासनानेही तातडीने आर्थिक मदत देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.गरिबांच्या संसारावर आलेले संकट हे केवळ नुकसान नसून, त्यांच्या आयुष्याचा आधारच हिरावून घेणारे असते.

# कोळगाव जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाला वाव; सांस्कृतिक कार्यक्रमांनी जिंकली प्रेक्षकांची मने

दैनिक वादळ वार्ता
**कोळगाव । प्रतिनिधी**



गणेश गाडेकर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनपर कार्यक्रमांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.कार्यक्रमाचे उद्घाटन गावातील मान्यवर आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांचे कौतुक केले आणि शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

**सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी**

स्नेहसंमेलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम होते. 'गणेश वंदना'ने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर छोट्या विद्यार्थ्यांनी 'कोळीगीत', 'शेतकरी गीत' आणि देशभक्तीपर गीतांवर बहारदार नृत्य सादर केले. तसेच, सद्यस्थितीवर भाष्य करणारी छोटी नाटके आणि प्रबोधनपर नाटिका सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.

**बक्षीस वितरण समारंभ**

वर्षभरात शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून मुलांच्या सर्वांगीण विकासाचे व्यासपीठ आहे, असे मत मुख्याध्यापकांनी आपल्या प्रास्ताविकात व्यक्त केले.

**ग्रामस्थांची मोठी उपस्थिती**

या सोहळ्यासाठी कोळगाव परिसरातील ग्रामस्थ, पालक आणि शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या पाल्यांचे कौतुक पाहून पालकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षकांनी केले, तर आभार प्रदर्शन करून स्नेहसंमेलनाची सांगता करण्यात आली.शाळेच्या या यशस्वी उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# चैनपुर केंद्राचे केंद्र समन्वयक राजेश्वर किशवे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील चैनपुर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे केंद्र समन्वयक राजेश्वर पंढरीनाथ किशवे हे सेवानिवृत्त झाले आहेत त्यानिमित्त त्यांचे गटशिक्षणाधिकारी कार्यालय व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी बालाजी शंकरराव गोडाजी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून हमीदजी दौलताबादी शिक्षण विस्तार अधिकारी, वीरभद्र चैनपुरे , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच, वैजनाथ काळे केंद्रप्रमुख हे उपस्थित होते. केंद्रप्रमुख राजेश्वर किशवे हे केंद्रप्रमुख या पदावर कार्यरत असलेले पद प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवा बजावून सेवानिवृत्त झाले त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन कार्यक्रमाचे ठिकाण चैनपुर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे करण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी केलेल्या वर्ष संख्या वर्षाच्या कारकिर्दीत कर्मचाऱ्यांचे नाव यांनी कार्यालयात अत्यंत प्रामाणिकपणे तत्परतेने आणि निष्ठेने सेवा दिली त्यांच्या कामातील शिस्त आणि सहकार्याची असलेले मैत्रीपूर्ण संबंध नेहमीच प्रेरणादायी राहिले आहेत असे प्रतिपादन या कार्यक्रमाचे अध्यक्ष देगलूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ अधिकारी बालाजी गोडाजी यांनी आपल्या भाषणातून त्यांचे कौतुक केले आहे. या कार्यक्रमास राजेश्वर किशवे केंद्रप्रमुख सेवानिवृत्त यांचे आई , वडील , पत्नी , यांचा सर्व शिक्षकांच्या वतीने व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सौ .बावगे मॅडम यांनी आपल्या भाषणातून त्यांचे केलेल्या कार्याची कौतुक केले आहे. यावेळी सौ. वाघमारे मॅडम, मु.अ. गोपझेडे , मु.अ. विजय अन्नमवार , गोजे सर, देशमुख सर, शेख समदानी, भालके सर, प्रकाश लवटे, मनियार सर ,प्रदीप कुलकर्णी, अनंत पांढरे, अविनाश चिद्रावार , जाधव सर, कल्लेटवाड सर, डॉ. संजय किशवे, डॉ.प्राजक्ता , किशवे माजी सरपंच विजयकुमार किशवे आदी देगलूर तालुक्यातील प्रत्येक शाळेचे शिक्षक, कर्मचारी , व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरखंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन गोजे सर यांनी केले आहे.

# वाढत्या उन्हात लहान मुलांची काळजी घ्या बालरोगतज्ज्ञ डॉ.संभाजी नावडकर यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्यात सध्या तापमानाचा पारा झपाट्याने वाढत असून, कडाक्याच्या उन्हाचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ *डॉ. संभाजी नावडकर* यांनी पालकांना सतर्क राहण्याचे आणि लहान मुलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.



वाढत्या उन्हामुळे लहान मुलांमध्ये डिहायड्रेशन (पाणी कमी होणे), उष्माघात, ताप आणि उलट्या यांसारखे त्रास उद्भवू शकतात. हे धोके टाळण्यासाठी डॉ. नावडकर यांनी खालील महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देण्यास सांगितले आहे.*डॉ. नावडकर यांनी दिलेल्या महत्त्वाच्या टिप्स.मुलांना दिवसभरात भरपूर पाणी प्यायला द्या. लिंबू सरबत, ताक, नारळ पाणी यांसारख्या नैसर्गिक पेयांचा आहारात समावेश करा.सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत मुलांना कडक उन्हात बाहेर पाठवू नका. अत्यंत गरजेचे असल्यास छत्री किंवा टोपीचा वापर करा. मुलांना हलके, सैल आणि सुती कपडे घालावेत, जेणेकरून शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. मुलांना ताजे आणि पचायला हलके अन्न द्यावे. शिळे अन्न किंवा उघड्यावरील पदार्थ देणे टाळावे. जर मुलाला खूप ताप येत असेल, सुस्ती जाणवत असेल किंवा लघवीचे प्रमाण कमी झाले असेल, तर घरगुती उपचार न करता तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

लहान मुलांची प्रतिकारशक्ती कमी असल्याने उन्हाळ्यातील आजार त्यांना लवकर ग्रासतात. त्यामुळे पालकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन डॉ. संभाजी नावडकर यांनी या निमित्ताने केले आहे.

# वीज टॉवर केबल चोरी प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर; बचाव पक्षाचा भक्कम युक्तिवाद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील वीज टॉवर केबल चोरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीस न्यायालयाने अटी व शर्तींसह जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात बचाव पक्षाकडून ॲड. दिनेश बिक्कड व ॲड. आशिषकुमार ठोंबरे यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडत आरोपीच्या जामिनासाठी भक्कम युक्तिवाद केला.




केज पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक १६१/२०२६ अंतर्गत संबंधित आरोपीविरुद्ध चोरी व दरोड्याचे गंभीर आरोप ठेवण्यात आले होते. भारतीय न्याय संहिता कलम ३१० (४), (५), (६) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २९ मार्च २०२६ रोजी आरोपीने वीज टॉवरवर चढून केबल वायर चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असून, त्या घटनेत टॉवर कोसळून मोठे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर आरोपी संशयास्पद हालचाली करताना आढळून आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले होते.

दरम्यान, न्यायालयीन सुनावणीदरम्यान बचाव पक्षाच्या वकिलांनी युक्तिवाद करताना सांगितले की, तपासाचा बहुतांश भाग पूर्ण झाला असून आरोपीला पुढील कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नाही. तसेच आरोपी पळून जाण्याची किंवा पुरावे नष्ट करण्याची शक्यता नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीस अटी व शर्तींसह जामीन मंजूर केला असून, तपासासाठी आवश्यकतेनुसार हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे परिसरात या प्रकरणाची पुन्हा चर्चा रंगू लागली असून, पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सिंदफणा चिंचोलीत मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

## काशीबाई तायड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा पुढाकार;ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

येथे भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काशीबाई तायड बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत पार पडलेल्या या शिबिराला गावातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागात आरोग्य सुविधा मर्यादित असताना अशा उपक्रमांमुळे नागरिकांना घराजवळच वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली.

मान्यवरांची उपस्थिती; ४० नागरिकांनी घेतला लाभया शिबिरात डॉ. स्नेहल पाठक मॅडम, स्टाफ नर्स दळवी मॅडम तसेच आरोग्य सेवक वाघमारे साहेब यांनी उपस्थित राहून नागरिकांची तपासणी केली. यावेळी उपसरपंच वैजिंता विश्वंभर तायड, सहकारी मनोज तायड तसेच कार्यक्रमाचे सहप्रमुख अनिल सर्जेराव तायड यांची उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.शिबिरादरम्यान नागरिकांची रक्तदाब, साखर, सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच विविध आजारांबाबत जनजागृती करून आवश्यक ते आरोग्य सल्ले देण्यात आले. एकूण ४० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला असून त्यामध्ये २५ महिला व १५ पुरुषांचा समावेश होता.

**ग्रामस्थांकडून समाधान; संस्थेच्या कार्याचे सर्वत्र कौतुक**

या शिबिरामुळे नागरिकांना वेळ आणि खर्चाची बचत झाली असून घराजवळच तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. काशीबाई तायड बहुउद्देशीय सेवाभावी संस्था ही संस्था सामाजिक व आरोग्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. संस्थेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077